ePaper

| वर्ष - 8 | अंक - 24 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 29 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## वरळीत आलिशान मोटरगाडीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू!



### आतील पानांत

- मनू भाकेरने रचला इतिहास!
- आलियाने सोडलेली 'ती' सवय
- अर्जुनच्या 'त्या'कृतींनी जिंकली मनं!
- ममतांचा आरोप दिशाभूल करणारा

## पुण्याचा वाढता विस्तार

# 'हडपसर' नवी महापालिका स्थापन करावी!

## नवीन महापालिकेची तातडीने गरज, शरद पवार यांची भूमिका

। पुणे ।महाईन्यूज

**वाढत्या शहरीकरणामुळे पुणे महापालिकेच्या यंत्रणेवर प्रचंड ताण येत असल्याने नागरिकांना किमान प्राथमिक सुविधा पुरविण्यासही यंत्रणा अपयशी ठरत आहे. त्यात दोन वर्षांपासून एकही महापालिका अस्तित्वात नसल्याने सर्व कारभार राज्य सरकारच्या हाती आहे. पुण्यासाठी स्वतंत्र महापालिकेचा विषय दहा वर्षांपासून प्रलंबित आहे. 'हडपसर' अशी नवी महापालिका स्थापन करावी, अशी आग्रही भूमिका राजकीय पक्षांनी तसेच नागरिकांनी सातत्याने मांडली आहे. शरद पवार यांनीही हीच भूमिका मांडल्याने नवीन महापालिकेचा गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.**





पुण्याचा वाढता विस्तार आणि नवीन गावांच्या समावेशामुळे शहरात स्वतंत्र महापालिकेची तातडीने गरज असताना ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शहरातील दुसऱ्या महापालिकेची भूमिका रविवारी पहिल्यांदाच जाहीरपणे मांडली. 'लोकसंख्येचा वाढता ताण ही पुण्यावरील भविष्यातील मोठी समस्या होऊ शकते. येत्या काळात हडपसर-हवेली ही स्वतंत्र महापालिका करण्याची गरज आहे,' असे सूचक विधान पवार यांनी केले. पवार यांच्या सूचनेमुळे नवीन महापालिकेची गरज अधोरेखित झाली आहे.

### प्रयत्न करण्याचे आश्वासन

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब शिवरकर यांच्या वानवडी येथील कार्यालयाला शरद पवार यांनी रविवारी भेट दिली. 'लोकसंख्येचा वाढता ताण ही पुण्यावरील भविष्यातील मोठी समस्या होऊ शकते. येत्या काळात हडपसर-हवेली ही स्वतंत्र महापालिका करण्याची गरज आहे,' असे सूचक विधान पवार यांनी त्या वेळी केले. 'हडपसर-हवेलीमधील नागरिकांचे मत जाणून मी या महापालिकेसाठी नक्की प्रयत्न करीन,' असे आश्वासन त्यांनी दिले.

### मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत मुद्दा

पूर्व पुण्याच्या विकासामध्ये शरद पवार यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. हडपसर येथील मगरपट्टा सिटी, ॲमेनोरा, सीरम कंपनी, रामटेकडी येथील औद्योगिक वसाहत, खराडी येथील 'आयटी पार्क' अशा मोठ्या प्रकल्पांना पवार यांनी कायम प्रोत्साहन दिले आहे. या पार्श्वभूमीवर पवार यांनी या भागासाठी स्वतंत्र महापालिकेची गरज अधोरेखित करून या विषयाला वाचा फोडली आहे. दरम्यान, उरुळी आणि फुरसुंगी या दोन गावांसाठी नगर परिषद करण्याऐवजी पुण्याच्या पूर्वेकडील आणखी गावांचा समावेश करून स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याची आवश्यकता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत मांडण्यात आली.

### दहा वर्षांपासून प्रलंबित

**पुण्याचा वाढता विस्तार पाहता नवी मुंबईप्रमाणे नव्या पुण्याची आवश्यकता आहे. पुण्यासाठी स्वतंत्र महापालिकेचा विषय दहा वर्षांपासून प्रलंबित आहे. पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे अशा तीन मुख्यमंत्र्यांच्या काळात त्याबाबत कोणताही निर्णय झाला नाही. गेल्या दोन वर्षांत इचलकरंजी आणि जालना अशा दोन महापालिका नव्याने स्थापन झाल्या आहेत. पुण्याच्या महापालिकेचे विभाजन करून 'पूर्व पुणे' किंवा 'हडपसर' अशी नवी महापालिका स्थापन करण्याची हीच योग्य वेळ आहे.**

> पुणे महापालिकेची हद्द वाढत असल्याने प्रशासनावर ताण येत आहे. हडपसर; तसेच समाविष्ट नवीन गावांकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे. हडपसरसह या गावांच्या विकासासाठी स्वतंत्र महापालिकेची आवश्यकता आहे.
>
> **- बाळासाहेब शिवरकर, ज्येष्ठ नेते**

## जुन्नर, खेड-आळंदी मतदारसंघावर शिवसेनेचा दावा?

## प्रभारी अन् निरिक्षकांचीही केली नियुक्ती

। पुणे । महाईन्यूज ।



आगामी विधानसभा निवडणुकीचे पडघडम वाजू लागले आहेत. राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्ष आपली ताकद वाढवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करत आहेत. अद्याप सत्ताधारी महायुती आणि विरोधात असलेल्या महाविकास आघाडीचेही जागा वाटप निश्चित झालेले नाही.परंतु आतापासून मतदारसंघावर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे दावा केला जात असल्याचे विविध राजकीय पक्षांच्या कृतीतून दिसून येत आहे.

याच पार्श्वभूमीवर आता जुन्नर आणि खेड-आळंदी या मतादारसंघावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा दावा दिसून येत आहे. कारण, प्रथमच विधानसभेसाठी सज्ज झालेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने जुन्नर आणि खेड आळंदी विधानसभा मतदारसंघासाठी प्रभारी म्हणून किरण पावसकर आणि निरिक्षक म्हणून नाना भानगिरे (खेड-आळंदी) आणि बाबा हांडे (जुन्नर) यांची नियुक्ती केली आहे.

### इच्छुकांची मोर्चेबांधणी...

खेड-आळंदी मतदारसंघात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर चाचपणी करत असल्याची चर्चा आहे. या मतदारसंघात शिवसेना (ठाकरे) गटाचे बाबाजी काळे यांनी विविध कार्यक्रमांद्वारे स्वतः इच्छुक असल्याचे दाखवून दिले आहे. तर राष्ट्रवादी (अजित पवार) गटाकडून विद्यमान आमदार दिलीप मोहिते यांची उमेदवारी अंतिम मानली जात आहे. तसेच राष्ट्रवादी (शरद पवार) गटाकडून अतुल देशमुख स्वतःला अजमावत आहेत.

# खडकवासला धरणातून विसर्गात वाढ

## सतर्क राहण्याचे जलसंपदा विभागाचे आवाहन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील पाणलोट क्षेत्रात संततधार कायम असल्याने रविवारी रात्री दहा वाजता ११ हजार क्युसेक वेगाने मुठा नदीपात्रात पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी सावधनता बाळगावी, असे आवाहन महापालिका आणि जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त होण्याची शक्यताही जलसंपदा विभागाकडून वर्तविण्यात आली आहे.**



शहरात गेल्या काही दिवसांपासून संततधार सुरू आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही पावसाचा जोर कायम राहिला आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस असल्याने खडकवासला धरणातून पाणी सोडण्यास सुरूवात झाली आहे. गेल्या गुरुवारी (२५ जुलै) खडकवासला धरणातून ४० हजार क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले होते. मात्र त्यानंतर विसर्गाचे प्रमाण वाढविण्यात आल्याने नदीला पूर येऊन नदीपात्रालगतच्या अनेक सोसायट्यांना त्याचा फटका बसला होता. पूर्वकल्पना न देता पाणीसोडण्यात आल्यामुळे आणि महापालिका तसेच जलसंपदा विभागात समन्वय नसल्यामुळे लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या रोषाला जलसंपदा विभागाला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे जलसंपदा विभागानेही आता सावध भूमिका घेतली आहे.खडकवासला धरणाच्या परिसरात पावसाचा जोर कायम असल्याने रविवारी रात्री ११ हजार क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून जाहीर करण्यात आले. पावसाचा प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त करण्यात येणार आहे. नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील पाणलोट क्षेत्रात संततधार कायम असल्याने रविवारी रात्री दहा वाजता ११ हजार क्युसेक वेगाने मुठा नदीपात्रात पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी सावधनता बाळगावी, असे आवाहन महापालिका आणि जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त होण्याची शक्यताही जलसंपदा विभागाकडून वर्तविण्यात आली आहे.नदीपात्रात साहित्य किंवा जनवारे असल्याच ती तातडीने सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावीत आणि नागरिकांनी सतर्कता बाळगावी.

### नागरिकांनी सावधानता बाळगावी

रविवारी रात्री ११ हजार क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून जाहीर करण्यात आले. पावसाचा प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त करण्यात येणार आहे. नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील पाणलोट क्षेत्रात संततधार कायम असल्याने रविवारी रात्री दहा वाजता ११ हजार क्युसेक वेगाने मुठा नदीपात्रात पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी सावधनता बाळगावी

### पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम

शहरात गेल्या काही दिवसांपासून संततधार सुरू आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही पावसाचा जोर कायम राहिला आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस असल्याने खडकवासला धरणातून पाणी सोडण्यास सुरूवात झाली आहे. गेल्या गुरुवारी (२५ जुलै) खडकवासला धरणातून ४० हजार क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले होते. मात्र त्यानंतर विसर्गाचे प्रमाण वाढविण्यात आल्याने नदीला पूर येऊन नदीपात्रालगतच्या अनेक सोसायट्यांना त्याचा फटका बसला होता. पूर्वकल्पना न देता पाणीसोडण्यात आल्यामुळे आणि महापालिका तसेच जलसंपदा विभागात समन्वय नसल्यामुळे लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या रोषाला जलसंपदा विभागाला सामोरे जावे लागले होते.

# पुणे रेल्वे स्टेशनवरून आता २४ तास रिक्षामित्र!

## प्रीपेड रिक्षासेवा शनिवारपासून सुरू

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे रेल्वेस्थानकावर रिक्षाचालक प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारत असल्याचे प्रकार वारंवार समोर येत होते. रिक्षाचालकांकडून सुरू असलेली प्रवाशांची ही लूट रोखावी, अशी मागणी केली जात होती.**



अखेर प्रवाशांची फसवणूक होऊ नये, यासाठी रेल्वेस्थानकावरील रिक्षामित्र ही प्रीपेड रिक्षासेवा शनिवारपासून (२७ जुलै) सुरू झाली आहे. रेल्वेस्थानकावरील प्रीपेड रिक्षा बूथ करोना संकटाच्या काळात सुरू होते. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर ते बंद झाले. प्रीपेड बूथ बंद झाल्यानंतर काही रिक्षाचालकांनी प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारण्यास सुरुवात केली. याबाबत सातत्याने तक्रारी केल्या जात आहेत. अखेर चार वर्षांनी प्रीपेड बूथ पुन्हा सुरू करण्याची पावले उचलण्यात आली. यासाठी रेल्वे प्रशासन, वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), पुणे महापालिका आणि रिक्षा संघटनांनी पुढाकार घेतला आहे. त्यातून पुणे स्थानकावर रिक्षामित्र ही सेवा सुरू झाली आहे.रिक्षामित्र ही सेवा जुन्याच प्रीपेड रिक्षा बूथमध्ये सुरू केली जात आहे. यासाठी रिक्षाचालकांची नोंदणीही करण्यात आली आहे. प्रीपेड रिक्षा बूथमध्ये मीटरनुसार प्रवाशाला भाडे आकारले जाणार आहे. याचबरोबर महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रवासाच्या मार्गाचे ट्रॅकिंग मोबाइलवरून पाहता येतील. ट्रॅकिंगची सुविधा प्रवाशांच्या नातेवाइकांनाही मिळेल. रिक्षामित्र सेवेचे उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत शनिवारी झाले, अशी माहिती 'बघतोय रिक्षावाला फोरम'चे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी दिली.

### रिक्षाचालकांना प्रोत्साहनपर सवलती

प्रीपेड रिक्षा बूथच्या उद्घाटनावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रिक्षाचालकांना प्रोत्साहनपर सवलती देण्याची घोषणा केली. ते म्हणाले की, रिक्षा बूथवरील सुविधा नि:शुल्क असेल. बूथवर नोंदणी केलेल्या सर्व रिक्षाचालकांना दोन गणवेश मोफत दिले जातील. याचबरोबर या रिक्षाचालकांना महिना एक हजार रुपयांचे सीएनजीचे कूपन दिले जाईल.

# ‘फेक नॅरेटिव्ह सेट’ करण्यासाठी

# इच्छुकांकडून आरोपांची चिखलफेक!

## राजकीय चढाओढीमुळे पिंपरी-चिंचवडकरांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे-पिंपरी-चिंचवड परिसरात आणि पवना धरण क्षेत्रात गेल्या आठवड्यात अतिमुसळधार पाऊस पडला. किंबहुना, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवडमधील जनजीवन विस्कळीत झाले. अपेक्षेप्रमाणे पावसाचे, पूर परिस्थितीचे राजकारण सुरू झाले. त्याचे पडसाद पिंपरी-चिंचवडमध्येही उमटले.**

शहराच्या विविध सखल भागांमध्ये पाणी साचले. त्यामुळे सत्ताधारी महायुती आणि विरोधी पक्षातील महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांनी चिखलफेक करण्याची संधी सोडली नाही. विशेषत: चिखली घरकूल प्रकल्पामध्ये शिरलेले पाणी यावरुन राजकारण तापले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांनी महायुतीचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांना टीकेचे धनी बनवले. किंबहुना, “साचलेले पाणी हे आमदारांच्या निष्क्रीयतेचे पाप आहे” असा गंभीर आरोपही केला. सोशल मीडियावर आमदार लांडगे यांच्यावर ‘रिल्स’ बनवण्यात आले. त्याद्वारे ‘नॅरेटिव्ह सेट’ करण्याचा प्रयत्न झाला.




### चिखली घरकूलमध्ये पावसाचे पाणी साचले त्याला जबाबदार कोण?

वास्तविक, सदर प्रकल्पामध्ये पाणी का साचले? त्याची तांत्रिक व भौगोलिक कारणे काय आहेत? या प्रकल्पाचे स्वरुप काय आहे? आणि झालेली आरोपांची चिखलफेक योग्य आहे का? याबाबत ‘महाईन्यूज’ ने “FACT CHECK ” करण्याचा प्रयत्न केला.

1.पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दवाढ १९९७ मध्ये झाली. त्यावेळी चिखली, तळवडे, मोशी, चऱ्होली, दिघी, डुडूळगाव आदी गावांचा समावेश करण्यात आला. तपूर्वी, महानगरपालिका प्रशासनाकडून जुन्या हद्दीलगत असलेल्या चिखतील जागेत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वयीत केला होता. जो आजही तिथे आहे.

2. सदर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून प्रक्रिया केले पाणी पूर्वी शेजारील तलावात साठवले जात होते. ते पाणी घरकूल विकसित होण्यापूर्वी परिसरातील शेतकरी शेतीसाठी वापर करीत होते. पावसाळ्यात तळ्यातील पाणी ‘ओव्हर फ्लो’ होत असे. ते पाणी नाल्याद्वारे नेवाळेवस्तीकडून काढून दिले जात असे.

3. २००७ मध्ये तत्कालीन काँग्रेस आघाडी सरकारने प्रकल्पांतर्गत आर्थिकदृष्या दुर्बल घटकांसाठी १३ हजार २५० सदनिका बांधण्याची योजना हाती घेतली. संपूर्ण आरक्षण ताब्यात न आल्यामुळे पुरेशा जागेअभावी ६ हजार ७२० सदनिकांचा ‘घरकूल प्रकल्प’ उभारण्याचे महानगरपालिकेने निश्चित केले. २००९ मध्ये सदर कामाला सुरूवात करण्यात आली. त्यावेळी “घरकूल प्रकल्पात पाणी साचले... विकासामध्ये नियोजनाचा अभाव... बकालपणा...” असे शब्द वापरुन आरोप करणारी मंडळी सत्ताधारी किंबहुना महानगरपालिका स्थायी समितीचे सभापती म्हणून कार्यरत होते.

4. घरकूल प्रकल्प ज्या ठिकाणी उभारण्यात आला. त्याच्या शेजारी ‘स्पाईन रस्ता’ विकसित करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या या जागेतून पूर्वी मुरूम काढला जात असे. सदर जागा महानगरपालिकेला हस्तांतरीत करुन प्रकल्प उभारण्याचे काम सुरू झाले. पण, स्पाईन रस्ता आणि घरकूल प्रकल्प यांची ‘आलाईमेंट’ व भौगोलिक रचना (चढ-उतार) याचा विचार नियोजनात झाला नाही.

5. घरकूल प्रकल्प स्पाईन रस्त्यापेक्षा सखल भागात असल्यामुळे पावसाळ्यात या भागात पाणी साचते. तसेच, एसटीपीतून बाहेर पाण्यासाठी स्वंतत्र पाईपलाईन केली नाही आणि जी पाईपलाईन बसवली आहे ती कमी व्यासाची आहे. पुन्हा सदर पाणी हे घरकुल प्रकल्पाच्या पाईपलाईनमध्येही सोडण्यात आले आहे. परिणामी, पावसाळ्यात एसटीपी ओव्हर फ्लो झाला की त्याचे पाणी घरकूलमध्ये शिरते, ही तांत्रिक अडचण प्रकल्पा उभारल्यापासूनची आहे, आजची नाही.

6. विशेष म्हणजे, घरकूल प्रकल्प उभारण्यात आला. सुमारे ७ हजार कुटुंब व किमान २५ हजार नागरिकांचा हा प्रकल्प आहे. पण, या ठिकाणी फक्त पाणी साचत नाही, तर इतरही अनेक समस्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पार्किंग, गार्डन, शाळा, खेळाचे मैदान, दवाखाना, सभागृह, मार्केट, पेव्हर ब्लॉक अशा पायाभूत सोयी-सुविधांचा अभाव होता. २००९ साली काम सुरू केलेला आणि २०१४ मध्ये अपूर्णावस्थेत असतानाही त्यावेळी काँग्रेस आघाडी सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ‘पॉलिटिकल मायलेज’ मिळवण्यासाठी नागरिकांना राहण्यास ताबा दिला. त्यामुळे ‘प्लॅनिंग स्टेज’च्या दूरदृष्टीच्या अभावामुळे सुरूवातीपासूनच हा प्रकल्प समस्यांच्या विळख्यात आहे.

### आमदार महेश लांडगे यांनी घरकूलसाठी काय केले?

अतिमुसळधार पावसामुळे पाणी साचले म्हणून महाविकास आघाडीतील इच्छुक उमेदवारांनी पाण्यात उतरून ‘ब्रँडिंग’ केले. सोशल मीडियावर आरोपांची राळ उडवून दिली. मग, आमदार महेश लांडगे यांनी या प्रकल्पासाठी काय केले? हेसुद्धा आम्ही तपासले. काँग्रेस आघाडी सरकारच्या कार्यकाळात सुरू झालेला आणि अपूर्णावस्थेत असलेला प्रकल्पात कोणतेही राजकीय भांडवल न करता टाऊन हॉलचे काम पूर्ण झाले आहे. खेळाचे मैदान वापरात आहे. भाजी मंडई, व्यापारी गाळे याचे वाटप झाले आहे. तसेच, दवाखानाही कार्यान्वयीत झाला आहे. आता घरकूलसाठी स्वतंत्र पोलीस ठाणेसुद्धा सुरू करण्याचे नियोजन केले. यापूर्वीच घरकूल आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी दोन स्वतंत्र पाईपलाईन टाकण्याबाबत प्रशासनाकडे प्रस्तावित केले आहे. घरकूलमधील जुनी ड्रेनेज लाईन बदलून मोठ्या व्यासाची पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

# धक्कादायकः पिंपरीतील वायसीएम रुग्णालयाचा आणखी एक प्रताप

## नवजात बालक जिवंत असताना डॉक्टरांनी बनवला स्मशान दाखला

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आय.ए.एस ट्रेनी अधिकारी पूजा खेडकर यांना दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या पिंपरीच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचा आणखी एक प्रताप समोर आला आहे. जिवंत नवजात बाळाचा स्मशान दाखला तयार केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहेत. हा सर्व प्रकार २३ जुलै सायंकाळी ५ वाजून २० मिनिटांचा आहे.**




वायसीएम रुग्णालयात महिलेने नवजात बालकाला जन्म दिला. त्या नवजात बाळाला डॉक्टरांनी मृत घोषित केलं. काही मिनिटांत त्याचा स्मशान दाखला तयार करण्यात आला. परंतु, नवजात बाळ हे जिवंत असून आयसीयूमध्ये उपचार घेत असल्याचं कागदपत्रांमध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अशा गलथान कारभार करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाईची मागणी होत आहे. एकीकडे महाराष्ट्रात पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाने दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी देखील या कामगिरीचं कौतुक केलं आहे. तर, दुसऱ्या काळ्या बाजूचं समर्थन होऊ शकत नाही. संबंधित डॉक्टरांवर कारवाईची मागणी होत आहे. याकडे आयुक्त शेखर सिंह यांनी लक्ष द्यायला हवं आहे. जिवंत नवजात बाळाचा स्मशान दाखल तयार केल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. हे सुंदर जग बघण्याआधीच डॉक्टरांनी त्या नवजात बाळाला मृत घोषित कस केलं? याप्रकरणी वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता राजेंद्र वाबळे यांच्याशी संपर्क केला, मात्र तो होऊ शकला नाही. आरोग्य अधिकारी गोफणे यांनी याबाबत माहिती घेऊन सांगतो, अस म्हणत वेळ मारून नेली आहे. एकूणच या प्रकरणी वायसीएम रुग्णालय असेल किंवा महानगरपालिकेचा आरोग्य विभाग हे गंभीर नाहीत असे स्पष्ट होत आहे. आयुक्त शेखर सिंह यांनीच कठोर पावलं उचलत कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### कागदपत्रांमध्ये काय नमूद आहे?

२३ जुलै २०२४ रोजी महिलेने ५ वाजून २० मिनिटांनी बाळाला जन्म दिला. ते बाळ मृत जन्माला आल्याचं त्या कागदपत्रांमध्ये नमूद आहे. मग, संध्याकाळी ७ वाजून ३७ मिनिटाला त्या बाळाचा स्मशान दाखला तयार करण्यात आला. ८:५६ ला बाळावर आयसीयूमध्ये उपचार सुरू होते.

# महाराज, बुवा यांच्या कहाण्या रचल्या गेल्यात!




भूमिका

**या कहाण्या ज्या काळात रचल्या गेल्या त्या काळात विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन पूर्णपणे मेलेला होता आणि आजही तो मारण्याचे काम सुरू आहे! कारण या कहाण्यांमध्ये.. चरित्रांमध्ये.. गाथांमध्ये.. अत्यंत अवैज्ञानिक चमत्कार ठासून भरलेले आहेत!**

आजच्या टीव्हीवरील मालिका या गाथा आणि ग्रंथांवर आधारलेल्या असतात, ज्यात ठासून चमत्कार तर असतातच, शिवाय कोणताही मागमूस आणि पुरावा नसलेल्या गोष्टी सतत दाखवलेल्या आढळतात. आणि या सर्व स्वामी, गुरु, महाराज, दादा, मामा, आणि बुवा यांची चरित्रं, त्यांच्या गाथा, त्यांचे प्रवचन आणि त्यांचे ग्रंथ या सगळ्यांमध्ये समान चमत्कार आढळतात!!

चमत्कार केल्याशिवाय कोणताही बुवा आणि महाराज किंवा स्वामी हा प्रचंड प्रसिद्ध झालेला नाही आणि त्याच्या मागे लाखो भोळे लोक भक्त बनून लागलेले नाहीत. चमत्काराला नमस्कार असतो हेच खरे असते. सर्वप्रथम दिसते असे की हे महाराज अचानक प्रकट झालेले असतात! त्यांचे जन्म ठिकाण, त्यांचे आधार कार्ड, त्यांचे आई बाबा आणि त्यांचे बालपण हे अत्यंत त्रोटक असते किंवा अजिबातच नसते. म्हणजे ते सामान्य माणसांप्रमाणे हॉस्पिटलमध्ये किंवा आईच्या पोटातून जन्माला आलेले नसतात.



याचा अर्थ ते बायोलॉजिकल नाहीयेत. म्हणजेच ते कुठल्यातरी अज्ञात शक्तिने जन्माला घातलेले आहेत. आणि अज्ञात शक्ती कोण हे एकाही भक्ताला माहिती नसते. त्याचे सर्व भक्त मात्र आईच्या पोटातून जन्माला आलेले असतात.

जसे हे सर्व महाराज स्वामी बुवा व गुरु प्रकट पावतात तसेच ते आंतर्धानही पावतात. म्हणजे ते अचानक नाहीसे होतात. कधी काश्मीरात राहत असतात आणि दुसऱ्या मिनिटाला ते कन्याकुमारीला प्रकटतात!! अंतर्धान, पावणे गुप्त होणे, नाहीसे होणे ही सर्व गुरु, महाराज, बुवा आणि स्वामी यांची खासियत आहे. आणि जी संपूर्ण अवैज्ञानिक आहे. असे असते तर भारताला सैन्य दल स्थापन करायची गरजच नाही. हा चमत्कार घेऊन परशत्रूच्या सैन्यामध्ये जाऊन प्रकट होऊन धडाधड सगळ्यांना मारून पुन्हा अंतर्धान पावणे ही आयडिया किती राष्ट्रवादी, राष्ट्रपयोगी व अखंड भारत निर्माण करायला उपयोगी पडेल ! पण तसे नसते हे भक्तांना कोण समजावणार?

या सर्व चमत्कारी बुवांचे स्वामींचे कॉमन चमत्कार म्हणजे ते उठता बसता दारिद्र्य नष्ट करतात. बहुधा अंबानी-अदानी सुद्धा अशा चमत्कारांमुळेच त्याचे दारिद्र्य नष्ट करू शकलेले आहेत...! मायक्रोसॉफ्ट वाले, फेसबुक वाले, आणि ट्विटर वाले उगाचच उद्योग करतात. त्यांनी कष्ट करण्याऐवजी कोणत्यातरी स्वामीचे, गुरुचे, महाराजाचे, आशीर्वाद घेतले असते तर ते सहजच करोडपती झाले असते. अब्जावधी कमावले असते. अमुक एका गावात जाऊन तेथे कोरड्या आडात पाणी आणले किंवा कोरड्या नदीत पुन्हा जलप्रवाह आणला असे चमत्कार या सर्व बुवांनी केलेले असताना उगाचच धरणे बांधत आम्ही बसलेलो आहोत. सर्व धर्मातील सर्व बुवा एक महत्त्वाचा चमत्कार करतात तो म्हणजे आंधळ्याला डोळे देतात, बहिऱ्याला ऐकू येईल अशी शक्ती देतात, मुक्याला बोलते करतात. म्हणजे सर्व पंचेंद्रिये ॲक्टिव्हेट करतात. असं जर असेल तर इ एन टी डॉक्टर किंवा कान नाक घसा डॉक्टर यांनी गुरुचरित्र वाचून आपले पेशंट बरे करायला हरकत नाही. काही बुवा-स्वामी हे चमत्कार करण्यासाठी काही वस्तू वापरतात. उदाहरणार्थ तांब्या, गोटी, दगड, अंगठी, पादुका, जपमाळ, आणि ते अशा वस्तूंमधूनअंगणात उकरल्यावर हंडा सापडतो असा दृष्टांत देतात आणि भक्त खुश होऊन असा धनलाभ झाल्याच्या भक्तीत तल्लीन होऊन त्या बुवा स्वामी महाराजाचे पाय धरून आयुष्यभर लीन होऊन जातो. सगळ्यात भारी चमत्कार म्हणजे हे सर्व धर्मातले सर्व बुवा महाराज, गुरु, स्वामी, रोगमुक्ती करतात. जसे काही आज जगात असलेले सगळे रोग यांनीच शोध लावलेले आहेत.. यांनीच आध्यात्मिक प्रयोगशाळेत औषधे काढलेली आहेत.. यांचे मंतरलेले इंजेक्शन हे सगळे डॉक्टर वापरतात आणि यांच्या गुरू आदेशाने ऑपरेशन होतात.. असाही मामला आहे की कॅन्सर पासून मधुमेहापर्यंत आणि अज्ञात रोगापासून अज्ञात शक्तिने निर्माण केलेल्या सर्व रोगांचे तारणहार आणि रोगमुक्तीकारक असे हे चमत्कारिक गुरु असतात आणि त्यांच्या गुरुचरित्रांमध्ये त्यांच्या मंत्रामध्ये आणि त्यांच्या प्रवचनांमध्ये हे ठासून सांगितले जाते. आणि भक्तही लगेचच आमचा अमुक रोग बरा झाला.

## प्रासंगिक »

### स्वाभिमान नाही?

***संसदेच्या आवारात कानोसा घेतला की जाणवतं अंतर्गत खदखद तीव्र होऊ लागली आहे.***

पूर्वी 'वॉच अँड वॉर्ड' या विभागाकडे संसदेच्या सुरक्षाव्यवस्थेची जबाबदारी असे. त्यांची जागा 'सीआयएसएफ'च्या जवानांनी घेतली आहे. त्यांच्यासाठी संसद असो वा विमानतळ सगळी ठिकाणं एकसारखीच. संसदेच्या आसपास कोणी भटकताना दिसला तर त्यांचं बकोट धरलं जातं. हे बदललेलं वातावरण 'वॉच अँड वॉर्ड'मधील अनेकांना पसंत पडलेलं नाही. त्यातील अनेक जण २०-२० वर्षं संसदेत तैनात आहेत. त्यांतील अनेकांनी संसदेच्या स्वागतकक्षांवर गरीब-सामान्य लोकांना पाहिलेलं आहे. आम्हाला पंतप्रधानांना भेटायचं आहे, आमची कामं होत नाहीत, त्यांच्याकडं आमचं म्हणणं मांडायचं आहे, सामान्य लोकांनी आणलेल्या पत्रावर पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता लिहून पत्र टपालपेटीत टाकायला मदत केली जात असे... आता सगळीकडं काळ्या पोशाखातील जवान दिसतात, ते फक्त केंद्रीय गृहमंत्रालयाला उत्तरदायी आहेत... 'वॉच अँड वॉर्ड'च्या सदस्यांचं काय करायचं हा प्रश्न संसदेला पडला आहे.

निकाल स्पष्ट होत असताना दिल्लीच्या हिंदी, इंग्रजी वर्तमान पत्रांच्या व वृत्त वाहिन्यांच्या कार्यालयातून फोन येणे सुरू झाले. महाराष्ट्रातील भाजपच्या पराभवाला शेतकऱ्यांची नाराजी कारणीभूत आहे का? असा प्रश्न असे. ग्रामीण भागात भाजपच्या झालेल्या पडझडी वरून ते दिसतच होते.

# शेतकरी मतांची दहशत तयार होऊ शकते

ही निवडणूक सर्वांचे डोळे उघडणारी व मस्तवाल सरकारला जागा दाखवणारी ठरली आहे. निवडणुकांमध्ये असे धक्कादायक बदल यापूर्वी सुद्धा झाले आहेत मात्र देशातील शेतकऱ्यांच्या रोषामुळे सरकार डळमळीत झाल्याची ही पहिलीच निवडणूक म्हणावी लागेल. तसे समाजातील अनेक घटक सत्ताधारी पक्षाच्या विरोधात असतात. त्या पक्षाला सत्तेतून बाहेर फेकण्यासाठी मतदान करत असतात. या निवडणुकीत मराठा आरक्षण, मुस्लिम मतांचे ध्रुवीकरण, महाराष्ट्रातील पक्ष फोडाफोडी व लोकशाही वाचवणे वगैरे विषय नाराजीला कारणीभूत आहेतच पण देशभरातील शेतकऱ्यांच्या नाराजीमुळे भाजपा चे उमेदवार पराभूत झाले हे या निवडणुकीत जाहीरपणे मान्य करण्यात आले.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात कांदा उत्पादकांची नाराजी होती हे मान्य केले. नितीन गडकरी यांनी सुद्धा शेतकरी नाराज असल्यामुळे मतदान विरोधात झाल्याचे म्हणाले. जम्मू काश्मीरचे



माझी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी एका मुलाखतीत जाहीरपणे सांगितले की या वेळेस शेतकऱ्यांनी सरकारला धडा शिकवला. जवळपास सर्व इंग्रजी, हिंदी, इंग्रजी, मराठी वर्तमानपत्रांनी, "शेतकरी विरोधी" सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांनी मतदान केल्याचे छापले. यात कांदा उत्पादकांनी सत्ताधारी पक्ष पडल्याचे प्रामुख्याने अधोरेखित केले आहेगेली दोन वर्ष कांदा पट्ट्यात शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाच्या नेत्यांनी नाशिक भागात सातत्याने काम केले. कधी कर्जमुक्ती, कधी कांदा निर्यातबंदी, कधी हमाल मापाडी प्रश्नावर शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्याचे काम सुरू होते. शेवटच्या टप्प्यात "कांदा रथाने" वातावरण निर्मिती केली. माझ्या अनेक लेखा मधून, व्हिडिओ मधून, समजमध्यमंवरील संदेशातून, "शेतकरी विरोधी सरकार पाडा", "कांद्याचे भाव पाडणारे सरकार पाडा", कांदा खाणारे सरकार पाडू शकतात तर कांदा पिकविणारे सुद्धा सरकार पाडू शकतात हे दाखवून द्या" असे वारंवार शेतकऱ्यांच्या डोक्यात भरवून मानसिकता तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. फक्त कांदाच नाही तर कापूस व सोयाबीन उत्पादकांनी सुद्धा या निवडणुकीत सरकारला झटका दाखवला आहे. नाशिक, दिंडोरी, धुळे, नगर, शिर्डी, शिरूर, बारामती, सोलापूर, धाराशिव, माढा मतदार संघ हा प्रामुख्याने कांदा उत्पादक पट्टा आहे. यातील डॉ. भरती पवार यांचा पराभव आगोदर निश्चित होता कारण त्यांनी नाफेड कांदा खरेदीत घोळ केल्याचा शेतकऱ्यांना दाट संशय आहे. नाफेड कांदा खरेदी बाबत चर्चेत शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्षांचा अपमान केल्याचा रोष ही कांदा उत्पादकां मध्ये होताच.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मग कोण कोणाला गाडतं!

## तिकीटावरून ठाकरे गट आणि शिंदे गटाच्या नेत्यांची एकमेकांवर टीका

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेची निवडणूक पुढील दोन ते तीन महिन्यांमध्ये जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर सध्या सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. राजकीय नेते मंडळी देखील विविध मतदारसंघाचा दौरा करत आपल्या पक्षांच्या पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेत आहेत. तसेच विविध ठिकाणी सभा, मेळावे आणि आढावा बैठका असं सध्या सर्व नेत्यांचं काम सुरु आहे. विधानसभेच्या निवडणुकीत राज्यात प्रामुख्याने महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगण्याची चिन्ह आहेत. पण या निवडणुकीच्या आधीच शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु झालं आहे.**



तिकीटावरून ठाकरे गट आणि शिंदे गटाचे नेते एकमेकांवर टीका टिप्पणी करत आहेत. ठाकरे गटाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आपल्याला उद्धव ठाकरेंचा आदेश आला तर गद्दारांना निवडणुकीत पाडणार असा इशारा दिला, तर त्यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना शिवसेना शिंदे गटाचे खासदार संदीपान भुमरे यांनी चंद्रकांत खैरे यांना खुलं आव्हान देत आधी उमेदवारी आणून दाखवा मग कोण कोणाला गाडतं आणि कोण कोणाला निवडून आणतं ते पाहू, असं खुलं आव्हान त्यांनी दिलं.मी इच्छुक असो किंवा नसो, पण प्रत्येक्षात उद्धव ठाकरे यांचा आदेश आला, 'मातोश्री'चा आदेश आला तर तो आदेश आमच्यासाठी शिरसावंद्य असेल. त्यामुळे जर 'मातोश्री'चा आदेश आला की या गद्दारांना निवडणुकीत पाडायचं, तर ज्यांनी गद्दारी केली तर त्यांना पाडलं पाहिजे", असं ठाकरे गटाचे नेते, माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं.ठाकरे गटाचे नेते, माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केलेल्या टीकेला शिवसेना शिंदे गटाचे नेते, खासदार संदीपान भुमरे यांनी प्रत्युत्तर देत चंद्रकांत खैरे यांना खुलं आव्हान दिलं. खासदार भुमरे म्हणाले, "त्यांना म्हणावं की आधी मतदारसंघात उमेदवारी आणा. त्यानंतर आपण पाहू की कोण कोणाला गाडतं? कोण कोणाला निवडून आणतं, हे नंतर पाहू. जर चंद्रकांत खैरे विधानसभेला उभे राहिले तर त्यांचं डिपॉझिट मतदारच घालतील", असा इशारा खासदार संदीपान भुमरे यांनी दिला.दरम्यान, माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केलेल्या विधानावर शिवसेना शिंदे गटाचे नेते, आमदार संजय शिरसाट यांनीही भाष्य करत त्यांना प्रत्युत्तर देत खोचक सल्ला दिला. शिरसाट म्हणाले, "सर्वात आधी त्यांनी (चंद्रकांत खैरे यांनी) त्यांच्या पक्षातील त्यांचे जीवाभावाचे सहकारी आहेत ज्यांनी त्यांचा दोनवेळा पराभव केला, त्यांचा आधी बंदोबस्त करावा.मला वाटत नाही की त्यांना (चंद्रकांत खैरे) यांना उमेदवारी मिळेल. कारण पक्ष आता उमेदवार बदलायच्या स्थितीत आहे. त्यामुळे चंद्रकांत खैरे यांचं 'मातोश्री'वर किती वजन आहे? हे जर त्यांनी उमेदवारी मिळवली तरच ते सिद्ध होईल. अन्यथा चंद्रकांत खैरे यांचं पक्षातील वजन संपलं असं म्हणायला काही हरकत नाही", अशी खोचक टीका संजय शिरसाट यांनी केली. विधानसभेच्या निवडणुकीतील तिकीटावरून ठाकरे गट आणि शिंदे गटाचे नेते एकमेकांवर टीका टिप्पणी करत आहेत. ठाकरे गटाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आपल्याला उद्धव ठाकरेंचा आदेश आला तर गद्दारांना निवडणुकीत पाडणार असा इशारा दिला, तर त्यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना शिवसेना शिंदे गटाचे खासदार संदीपान भुमरे यांनी चंद्रकांत खैरे यांना खुलं आव्हान देत आधी उमेदवारी आणून दाखवा मग कोण कोणाला गाडतं आणि कोण कोणाला निवडून आणतं ते पाहू,

### चंद्रकांत खैरे यांना खुलं आव्हान

मातोश्री'चा आदेश आला तर तो आदेश आमच्यासाठी शिरसावंद्य असेल. त्यामुळे जर 'मातोश्री'चा आदेश आला की या गद्दारांना निवडणुकीत पाडायचं, तर ज्यांनी गद्दारी केली तर त्यांना पाडलं पाहिजे", असं ठाकरे गटाचे नेते, माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं.ठाकरे गटाचे नेते, माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केलेल्या टीकेला शिवसेना शिंदे गटाचे नेते, खासदार संदीपान भुमरे यांनी प्रत्युत्तर देत चंद्रकांत खैरे यांना खुलं आव्हान दिलं. खासदार भुमरे म्हणाले.

---

# प्रकाश आंबेडकर व आमच्यात भांडण लावू नका

## मुख्यमंत्र्यांच्या 'त्या' सूचनेनंतर मनोज जरांगेंचा इशारा

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रकाश आंबेडकर आणि आम्ही सत्तेत नाही, मग आमच्यात कशाला भांडण लावता?" असा प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारला आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेवर मनोज जरांगे पाटील यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. "आमच्यात भांडण लावू नका, तुम्ही तसा प्रयत्न केलात तर तुम्हाला हे प्रकरण अवघड जाईल", असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.**



"मराठा व ओबीसी आरक्षणाबाबत प्रकाश आंबेडकर व मनोज जरांगे पाटील यांनी बसून चर्चा केली पाहिजे", अशी सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. त्यावर आज जरांगे पाटील यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. "आमच्या आमच्यात (मराठा समाज व प्रकाश आंबेडकर) गुंता निर्माण करू नका", असं जरांगे पाटील म्हणाले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले होते, "माझं सर्वांना आवाहन आहे की आरक्षणप्रणी सर्वांनी एकत्र बसून चर्चा करावी. तुमच्या ज्या काही मागण्या असतील त्या मांडाव्यात. मराठा आणि इतर समाजांच्या मागण्यांवर आपल्या सरकारने मोठ्या प्रमाणात कामं केली आहेत. मनोज जरांगे असतील किंवा ओबीसी नेते असतील, या सर्वांनी एकत्र बसून चर्चा करावी. विवधी समाजांच्या आरक्षणाबाबतच्या मागण्यांवर सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र बसून मार्ग काढला पाहिजे. मराठा आरक्षणाबाबत आमची पहिल्या दिवसापासून जी भूमिका होती तीच आजही कायम आहे.

### एकत्र बसून चर्चा करायला सांगतायत

मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देणे, ही आमची भूमिका आहे. त्यामुळे कोणीही कोणावरही आरोप अथवा टीका करू नये."मुख्यमंत्री एकनाथ शिंदें यांच्या सूचनेवर प्रतिक्रिया देताना मनेज जरांगे पाटील म्हणाले, मुख्यमंत्री आम्हाला आणि प्रकाश आंबेडकरांना एकत्र बसून चर्चा करायला सांगतायत. मात्र, ना आम्ही सत्तेत आहोत, ना प्रकाश आंबेडकर सत्तेत आहेत. त्यामुळे आम्ही आमच्यात चर्चा करून काय होणार आहे? उलट तुम्ही आमच्यातला गुंता वाढवत आहात. मला असं वाटतं की मुंबईतून आता आमदारांना हाकलून देण्याची वेळ आली आहे.

# प्रभू श्रीराम यांची अकबराशी तुलना?

## व्हायरल व्हिडीओनंतर यूपीएससी शिक्षिकेनं दिलं स्पष्टीकरण!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**UPSC सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी उमेदवारांची तयारी करून घेणाऱ्या गाईड शुभ्रा रंजन यांचा एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये त्या मुघल सम्राट अकबर व श्रीराम यांची तुलना करत असल्याचा दावा करण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसांपासून सोशल मीडियावर या व्हिडीओवर नेटिझन्सकडून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. यासंदर्भात काहींनी शुभ्रा रंजन यांच्या बाजूने भूमिका घेतली असून काहींनी त्यांच्यावर टीका केली आहे. या व्हायरल व्हिडीओवरून वाद निर्माण झाल्यानंतर स्वत: शुभ्रा रंजन यांनी त्यावर स्पष्टीकरण दिलं आहे.**




या व्हिडीमध्ये शुभ्रा रंजन या एका ऑनलाईन सेशनमध्ये उमेदवारांना भारतीय व पाश्चात्य राजांमधील फरक समजावून सांगताना दिसत आहेत. त्याचवेळी त्यांनी भारतातील वेगवेगळ्या काळातील राजांची कार्यपद्धतीही समजावून सांगितली. यासाठी त्यांनी श्रीराम व अकबर यांची उदाहरणं घेतली. मात्र त्यावरूनच वाद निर्माण झाल्यानंतर त्यांनी या सर्व प्रकरणावर स्पष्टीकरण जारी केलं आहे.श्रीराम यांची एक राजा म्हणून सत्ता अमर्यादित नसून ती प्रथा-परंपरांनी निश्चित केली आहे. त्यामुळे श्रीराम नैतिकता काय आहे हे सांगत नसून ते प्रथा-परंपरांमधून चालत आलेल्या नैतिकतेचं संरक्षण आणि अंमलबजावणी करतात. पण अकबर मात्र स्वत: नैतिकता ठरवतो आणि त्याचा निर्णय सगळ्यांवर नैतिकता म्हणून लागू होतो", असं शुभ्रा रंजन या व्हिडीओमध्ये सांगताना दिसत आहेत.शुभ्रा रंजन यांच्या या संपूर्ण व्हिडीओमधील एक क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली. त्यावर अनेकांनी आक्षेप नोंदवले. काहींनी सायबर पोलिसांकडे त्यांची तक्रारही केल्याचं नमूद केलं आहे. शुभ्रा रंजन यांनी धर्मविरोधी कृत्य केलं असून हिंदू धर्मीयांच्या भावना दुखावल्या आहेत, असा दावाही करण्यात आला. त्याशिवाय, रंजन या UPSC सारख्या परीक्षेतून सनदी अधिकारी बणण्यासाठी इच्छुक उमेदवारांच्या मनात चुकीच्या गोष्टी भरवत असल्याचाही आरोप काहींनी केला.दरम्यान, शुभ्रा रंजन यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर यासंदर्भात स्पष्टीकरण दिलं आहे. "कुणाच्याही भावना दुखावण्याचा माझा हेतू नव्हता. जर तसं काही झालं असेल तर मी त्यासाठी माफी मागते. तुम्ही जर तो संपूर्ण व्हिडीओ पाहिला, तर लक्षात येईल की मी प्रभू श्रीरामाचं राज्य खऱ्या अर्थानं आदर्श राज्य होतं हे समजावून सांगत आहे", असं शुभ्रा रंजन यांनी त्यांच्या स्पष्टीकरणात म्हटलं आहे.जो व्हिडीओ व्हायरल होत आहे, ती पूर्ण व्हिडीओमधली फक्त एक क्लिप आहे. आमच्या वर्गात झालेल्या सविस्तर चर्चेतला तो फक्त एक छोटासा भाग आहे. ती चर्चा तुलनात्मक अभ्यासासंदर्भात होती. अनावधानाने त्यातून काही चुकीचा संदेश गेला असेल, तर आम्ही त्यासाठी दिलगिरी व्यक्त करतो", असंही त्यांनी स्पष्टीकरणात नमूद केलं आहे.काही नेटिझन्सनी शुभ्रा रंजन यांच्या समर्थनार्थ प्रतिक्रिया दिल्या आहेत. "शुभ्रा रंजन यांनी म्हटलंय की अकबर स्वत:च नैतिकतेसंदर्भातले नियम ठरवत होता. पण श्रीराम मात्र प्रथा-परंपरांनी निश्चित झालेली नैतिकता पाळत होते. श्रीराम यांच्या कामाचा एक राजा म्हणून आढावा घेण्याच गैर काय आहे?" असा प्रश्न काही युजर्सनं उपस्थित केला आहे.या व्हिडीमध्ये शुभ्रा रंजन या एका ऑनलाईन सेशनमध्ये उमेदवारांना भारतीय व पाश्चात्य राजांमधील फरक समजावून सांगताना दिसत आहेत. त्याचवेळी त्यांनी भारतातील वेगवेगळ्या काळातील राजांची कार्यपद्धतीही समजावून सांगितली. यासाठी त्यांनी श्रीराम व अकबर यांची उदाहरणं घेतली. मात्र त्यावरूनच वाद निर्माण झाल्यानंतर त्यांनी या सर्व प्रकरणावर स्पष्टीकरण जारी केलं आहे.श्रीराम यांची एक राजा म्हणून सत्ता अमर्यादित नसून ती प्रथा-परंपरांनी निश्चित केली आहे. त्यामुळे श्रीराम नैतिकता काय आहे हे सांगत नसून ते प्रथा-परंपरांमधून चालत आलेल्या नैतिकतेचं संरक्षण आणि अंमलबजावणी करतात.

### सायबर पोलिसांकडे त्यांची तक्रार

पण अकबर मात्र स्वत: नैतिकता ठरवतो आणि त्याचा निर्णय सगळ्यांवर नैतिकता म्हणून लागू होतो", असं शुभ्रा रंजन या व्हिडीओमध्ये सांगताना दिसत आहेत. शुभ्रा रंजन यांच्या या संपूर्ण व्हिडीओमधील एक क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली. त्यावर अनेकांनी आक्षेप नोंदवले. काहींनी सायबर पोलिसांकडे त्यांची तक्रारही केल्याचं नमूद केलं आहे. शुभ्रा रंजन यांनी धर्मविरोधी कृत्य केलं असून हिंदू धर्मीयांच्या भावना दुखावल्या आहेत, असा दावाही करण्यात आला. त्याशिवाय, रंजन या UPSC सारख्या परीक्षेतून सनदी अधिकारी बणण्यासाठी इच्छुक उमेदवारांच्या मनात चुकीच्या गोष्टी भरवत असल्याचाही आरोप काहींनी केला.

# ममतांचा आरोप दिशाभूल करणारा

## निती आयोग बैठकीकडे दहा मुख्यमंत्र्यांचीही पाठ

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**निती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीत बोलत असताना आपल्यासमोरील माइक बंद केला गेला. ही अत्यंत अपमानास्पद वागणूक होती, असा दावा करत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी बैठक अर्ध्यावर सोडून निघून गेल्या. या बैठकीला दहा राज्यांचे मुख्यमंत्री गैरहजर होते.**



ममतांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत बैठकत्याग केला. सरकारने ममता या दिशाभूल करत असल्याचा आरोप केला. ममतांची बोलण्याची वेळ संपली होती. त्यांचे बोलणे थांबवले गेले नाही, असा प्रतिदावा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केला. विरोधी पक्षच नव्हे तर, राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्ष जनता दलाचे (संयुक्त) प्रमुख व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार हेदेखील बैठकीला गैरहजर राहिले. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये बिहारला मोठे अर्थसाह्य केले असले तरी, राज्याला विशेष दर्जा देण्याची मागणी केंद्राने फेटाळल्याने नितीशकुमारांकडून अप्रत्यक्षपणे नाराजीचे सूर उमटल्याचे मानले जात आहे. पक्षाचे नेते के.सी. त्यागी यांनी हा दावा फेटाळला.'इंडिया' आघाडीतील विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांनी नवी दिल्लीतील निती आयोगाच्या बैठकीवर बहिष्कार टाकल्यामुळे तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी विरोधकांचे प्रतिनिधित्व केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील या बैठकीमध्ये मुख्यमंत्री या नात्याने ममता बॅनर्जी यांनाही मुद्दे मांडण्याची संधी दिली गेली.

### बैठकीवर बहिष्कार टाकला

बॅनर्जी यांच्या भाषणाच्या पहिल्या पाच मिनिटांमध्ये त्यांचा माइक बंद करण्यात आला व त्यांना मुद्दे मांडण्यापासून रोखले गेले, बॅनर्जी यांनी बैठक अर्ध्यावर सोडून बाहेर आल्यानंतर पत्रकारांकडे केला.या बैठकीमध्ये विकसित भारत-२०४७ या संकल्पनेवर चर्चा करण्यात आलीमात्र, या बैठकीवर काँग्रेस राज्यांतील तीनही मुख्यमंत्र्यांनी बहिष्कार टाकला. तसेच, राज्यांवर अर्थसंकल्पात अन्याय केल्याच्या निषेधार्थ केरळ, तमिळनाडू, झारखंड, पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनीही बैठकीला गैरहजर राहण्याचा निर्णय घेतला. दिल्ली सरकारमधील मंत्री व 'आप'च्या नेत्या आतिशी यांनीही बैठकीवर बहिष्कार टाकला.

# अभिनेता सोनीने आपल्या खासगी आयुष्याबद्दल खुलासा केला

बॉलीवूडचे कलाकार सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटातील भूमिकेमुळे, कधी त्यांच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे तर कधी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. आता अभिनेता समिर सोनीने आपल्या खासगी आयुष्याबद्दल खुलासा केला आहे.उज्वल त्रिवेदी यांच्या युट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत आपल्या खासगी आयुष्याबद्दल खुलासा केला आहे. त्याने अभिनेत्री आणि त्याची पत्नी नीलमबरोबरचे नाते कसे जुळले यावर बोलताना म्हटले आहे की, “जेव्हा नीलमने त्याला पहिल्यांदा पाहिले, तेव्हा ती तिची मैत्रीण आणि निर्माती एकता कपूरबरोबर होती. त्यावेळी मी गोड दिसतो, चांगला दिसतो, हे तिने तिच्या मैत्रीणीला सांगितले, तिने आणखी कोणालातरी सांगितले आणि माझ्यापर्यंत ती गोष्ट



पोहचली. नीलम ८०-९०च्या दशकात आघाडीची अभिनेत्री होती. अशा अभिनेत्रीकडून माझे कौतुक होणे, माझ्यासाठी आनंदाची गोष्ट होती. त्यामुळे माझा स्वत:वरचा विश्वास वाढला. त्यानंतर मला एका ज्योतिषाने सांगितले की, न अद्याक्षरावरुन नाव असणारी मुलगी माझ्या आयुष्यात येईल. ती मुलगी दागिन्यांसाठी काम करत असेल. मला माहीत नाही, नीलमने त्या ज्योतिषाला पैसे दिले होते की काय पण ज्यातिषाने मला तसे सांगितल्यावर माझ्या मनात लगेच नीलमचा विचार आला. पण त्यावेळी वाटले हा निव्वळ योगायोग आहे. त्यानंतर मी वर्तमानपत्रात येणाऱ्या फोटोंकडे लक्ष द्यायला सुरुवात केली.पुढे बोलताना अभिनेत्याने म्हटले आहे की, त्यानंतर दीड वर्षानंतर एका दिवाळी पार्टीत आमची भेट झाली. एकताने आमची ओळख करून दिली, मी तिला म्हटले की तू खूप गोड दिसतेस. तिथून निघताना माझ्याकडे तिचा नंबर नव्हता पण, मी तिला म्हणालो की मी तुला फोन करेन.

## आर्चीच्या घरी आली नवी पाहुणी!

मराठी कलाविश्वात ‘सैराट’ हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला होता. या चित्रपटात मुख्य भूमिका साकारलेली अभिनेत्री रिंकू राजगुरु आता महाराष्ट्रातील घराघरांत लोकप्रिय आहे. रिंकूला ‘सैराट’ चित्रपटातील ‘आर्ची’ या नावाने देखील ओळखलं जातं. प्रेक्षकांच्या या लाडक्या अभिनेत्रीच्या घरी एका नव्या पाहुणीचं आगमन झालं आहे. याबद्दल सोशल मीडियावर फोटो शेअर करत रिंकूने माहिती दिली आहे.रिंकू राजगुरुने तिच्या आयुष्यातील पहिली गाडी नुकतीच खरेदी केली आहे. या आलिशान गाडीचे फोटो अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत.
गेल्या काही दिवसांत अनेक मराठी कलाकारांनी नव्या गाड्या घेत आपली स्वप्नपूर्ती केल्याचं पाहायला मिळालं. यामध्ये आता रिंकूचं नाव देखील जोडलं गेलं आहे.नव्या गाडीबरोबरचे फोटो शेअर करत रिंकू लिहिते, “पहिली गाडी ही कायम खास असते… हक्काची पहिली गाडी खरेदी करण्याची भावना काहीतरी वेगळीच असते… जी तुम्ही शब्दांत व्यक्त करू शकत नाही. ही गाडी म्हणजे माझं नवीन प्रेम आहे.”पांढऱ्या रंगाच्या आलिशान गाडीबरोबर रिंकूने ट्विनिंग करत फोटोशूट केलं आहे. रिंकूने नवीन गाडी खरेदी केल्याचं समजताच तिच्या चाहत्यांनी अभिनेत्रीवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. स्वप्नील जोशी, छाया कदम, ऋतुजा बागवे, सायली संजीव, प्रार्थना बेहेरे, किशोर शहाणे, श्वेता रंजन यांनी कमेंट्स करत रिंकूवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

## आलियाने सोडलेली ‘ती’ सवय



आलिया भट्ट व रणबीर कपूर यांच्याकडे कलाविश्वातील आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं. एकमेकांना जवळपास ५ वर्षे डेट केल्यावर या दोघांनी एप्रिल २०२२ मध्ये लग्न केलं. ‘ब्रह्मास्त्र’ चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान आलिया-रणबीरमध्ये खूप चांगली मैत्री झाली. यानंतर या मैत्रीचं रुपांतर पुढे प्रेमात झालं. या जोडप्यामध्ये जवळपास १० वर्षांचं अंतर आहे. आलिया रणबीरपेक्षा वयाने लहान असल्याने सुरुवातीच्या काळात यांना प्रचंड ट्रोल केलं गेलं. परंतु, आलिया रणबीरने सर्वांना आपलं बॉण्डिंग सिद्ध करून दाखवलं. नुकत्याच निखिल कामथला दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्याने आपली बायको व वैवाहिक जीवनाबद्दल खुलासा केला आहे.रिलेशनशिपमध्ये आल्यानंतर आलियाने स्वत:मध्ये अनेक बदल केल्याचं यावेळी रणबीरने मान्य केलं. अभिनेता म्हणतो, “आपलं लग्न झाल्यावर आपल्याला दैनंदिन जीवनातील अनेक गोष्टी व सवयींमध्ये बदल करावा लागतो. आपलं मूळ व्यक्तिमत्त्व बाजूला सारून विचार करावा लागतो. आलिया अन् माझं सुद्धा असंच आहे. प्रत्येक गोष्टीत एकमेकांना जास्तीत जास्त समजून घेण्याचा आमचा प्रयत्न असतो.”रणबीर पुढे म्हणाला, “याचं उदाहरण सांगायचं झालं तर, आलिया आधी खूप मोठ्या आवाजात बोलायची. माझे वडील सुद्धा आमच्याशी तसेच बोलायचे… त्या मोठ्या आवाजाचा मला त्रास व्हायचा. तिला सगळं समजल्यावर आलियाने मोठ्या आवाजात बोलणं पूर्णपणे कमी केलं. जेव्हा तुम्ही वयाची ३० वर्षे असे वागता अन् अचानक तुम्हाला कोणीतरी बदल करायला सांगितला तर निश्चित ती गोष्ट करणं अवघड जातं. पण, तिने माझ्यासाठी तो बदल केला.” “आलिया माझ्यासाठी खूप बदलली… मी सुद्धा तिच्यासाठी बदलण्याचा प्रयत्न करत आहे. तिच्याकडे पाहून मला नेहमी आपणही बदललं पाहिजे…तिला हवं तसं वागलं पाहिजे असं वाटतं” असं रणबीर कपूरने सांगितलं. रणबीर-आलिया नेहमीच एकमेकांना खंबीरपणे साथ देताना दिसतात. या दोघांना राहा नावाची गोंडस मुलगी आहे. या जोडप्याप्रमाणे राहा सुद्धा सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय आहे.रणबीरबरोबर रिलेशनशिपमध्ये आल्यानंतर आलियाच्या वागण्या-बोलण्यात सुरुवातीपेक्षा प्रचंड बदल झाल्याचं तिच्या चाहत्यांना देखील जाणवलं होतं. आता मुलाखतींमध्ये देखील अभिनेत्री फार विचारपूर्वक बोलते. याकडे आलिया अतिशय सकारात्मकतेने पाहते व याचं संपूर्ण श्रेय आपल्या नवऱ्याला देत असते.दरम्यान, रणबीर कपूर शेवटचा ‘ॲनिमल’ मध्ये झळकला होता. त्याच्याबरोबर या चित्रपटात रश्मिका मंदाना, बॉबी देओल, तृप्ती डिमरी यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. या लवकरत आलिया-रणबीर ( RANBIR KAPOOR AND ALIA BHATT ) संजय लीला भन्साळी दिग्दर्शित ‘लव्ह अँड वॉर’ चित्रपटात झळकणार आहेत.

## अर्जुनच्या ‘त्या’कृतीनं जिंकली मनं!

बॉलीवूडचे कलाकार हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटांमुळे, कधी त्यांच्या मुलाखतीदरम्यान केलेल्या वक्तव्यांमुळे, तर कधी त्यांच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. आता अभिनेता अर्जुन कपूर (ARJUN KAPOOR) सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या एका व्हिडीओमुळे सध्या चर्चेत आहे.अभिनेता अर्जुन कपूर आणि मलायका अरोरा यांनी दिल्लीत पार पडलेल्या ‘इंडिया कॉउचर वीक २०२४’ या कार्यक्रमाला हजेरी लावल्याचे पाहायला मिळाले. समोर आलेल्या व्हिडीओमध्ये मलायका आणि अर्जुन पहिल्या रांगेत बसलेले दिसत आहेत. महत्त्वाचे म्हणजे, एकाच रांगेत असूनही ते शेजारी बसले नाहीत, तर वेगवेगळ्या ठिकाणी बसले आहेत. आता या कार्यक्रमादरम्यानचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे. या व्हिडीओमध्ये अर्जुन कपूर चाहत्यांनी वेढलेला दिसत आहे. हे चाहते त्याच्याबरोबर सेल्फी काढत आहेत. त्याचवेळी मलायका त्या ठिकाणी येते, मात्र अर्जुनभोवती चाहत्यांची गर्दी असल्याने तिला पुढे जाता येत नाही. त्यावेळी अर्जुन चाहत्यांना मलायकासाठी वाट करून देण्यासाठी सांगतो आणि मलायका पुढे जाते. असे या व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नेटकरी अर्जुन कपूरचे कौतुक करताना दिसत आहेत.गेल्या अनेक दिवसांपासून या दोघांचे ब्रेकअप झाल्याच्या चर्चा सुरू आहेत. काही दिवसांपूर्वीच अर्जुन कपूरने सोशल मीडियावर एक स्टोरी शेअर करत लिहिले होते, “सकारात्मक असणे म्हणजे सगळ्या गोष्टी व्यवस्थित होतील, तुम्हाला हव्या तशा घडतील असे नाही; तर गोष्टी कशाही घडू देत, कोणत्याही परिस्थितीत तुम्ही

## ‘KALKI : 2898AD’ चित्रपटाची बॉक्स ऑफिसवर यशस्वी घोडदौड

प्रभासचा ‘कल्की : २८९८ एडी’ चित्रपट बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई करत धुमाकूळ घालताना दिसत आहे. २७ जून २०२४ ला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने ३१ व्या दिवशीदेखील बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली आहे. महत्त्वाचे म्हणजे, प्रदर्शित झाल्यापासून महिन्यानंतरही प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात तो यशस्वी ठरला आहे. पाचव्या शनिवारी या चित्रपटाची भारतातील एकूण कमाई ६२७.८५ कोटी रुपये झाली आहे. नाग अश्विन दिग्दर्शित ‘कल्की : २८९८ एडी’ या चित्रपटाने चित्रपटगृहात एक महिना पूर्ण केला असून कमाईच्या बाबतीत



सातत्य राखले आहे. याचप्रकारे ‘कल्की : २८९८ एडी’ चित्रपट कमाई करत राहिला तर गेल्यावर्षी शाहरूख खानचा हिट ठरलेला ‘जवान’ चित्रपटावर मात करू शकतो. ‘जवान’ने भारतात ६४०.२५ कोटी रुपयांची कमाई केली होती. याबरोबरच, ‘कल्की : २८९८ एडी’ या चित्रपटाने जगभरात ११०० कोटींचा गल्ला जमवत शाहरुख खानच्या ‘पठाण’ चित्रपटाला मागे टाकले आहे. मात्र, ‘जवान’ चित्रपटाने ११६० कोटींची कमाई करत विक्रम रचला होता, जगभरात इतकी मोठी कमाई करणारा हा पाचवा चित्रपट ठरला होता. तो विक्रम मोडण्यासाठी ‘कल्की’ चित्रपटाला आणखी कमाई करणे आवश्यक आहे.


# मनू भाकेरने रचला इतिहास!

## नेमबाजीत भारताला मिळवून दिले पहिले पदक

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारताची २२ वर्षीय नेमबाज मनू भाकेरने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये इतिहास रचला आहे. तिने या स्पर्धेत कांस्यपदकावर आपले नाव कोरले आहे. मनू भाकेरने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलच्या अंतिम फेरीत चमकदार कामगिरी करत कांस्यपदक जिंकले. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी मनू ही पहिली महिला नेमबाज ठरली आहे. नेमबाजीत भारताच्या मनू भाकेरने कांस्य पदक जिंकत यंदाच्या ऑलिम्पिक २०२४ मधील पहिले पदक पटकावून दिले आहे. पॉईंट १ गुणाने मागे राहिल्याने मनू भाकेरला तिसऱ्या स्थानी समाधान मानावे लागले.**



कोरियाच्या नेमबाजाने आघाडी मिळवली. मनू भाकेरने अंतिम सामन्यात २२१.७ गुणांसह हे पदक जिंकले. पॅरिस ऑलिम्पिकमधील भारताचे हे पहिले पदक आहे. मनू भाकेर २१व्या शॉटने दुसऱ्या स्थानावर पोहोचली होती, पण अखेरीस ती तिसऱ्या स्थानावर राहिली. कोरियाच्या दोन्ही नेमबाजांनी सुवर्ण आणि रौप्य पदक जिंकले. मनू भाकेर ही भारताला नेमबाजीमध्ये भारताला पदक जिंकवून देणारी पहिली महिला नेमबाज ठरली आहे. सुरूवातीपासूनच मनू दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानी कायम होती पण अवघ्या एका पॉईंटने मनू मागे राहिली. पण तिने भारताला पदक पटकावून दिलं.अवघ्या नऊ महिन्यांपूर्वी मनू भाकेरचा १० मीटर एअर पिस्तुलसाठी भारतीय संघात समावेशही नव्हता. गेल्या वर्षी ती हँगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळली होती, पण या स्पर्धेसाठी ती संघात नव्हती. ही घटना तिच्या हृदयाच्या सर्वात जवळ आहे. एशियाडपूर्वी मनू भाकेरने मागील सर्व वाद विसरून प्रशिक्षक जसपाल राणा यांच्याशी हातमिळवणी केली, यामागचे एक कारण म्हणजे १० मीटर एअर पिस्तुलमध्ये पुन्हा वर्चस्व प्रस्थापित करणे. एशियाडनंतर मनूचे समर्पण आणि जसपालची साथ कामी आली.मनू भाकेर हरियाणातील झज्जर जिल्ह्यातील गोरिया गावातील रहिवासी आहे. २०१८ आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत मनूने भारतासाठी दोन सुवर्णपदके जिंकली होती. या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती सर्वात तरुण भारतीय महिला नेमबाज राहिली आहे. वयाच्या १६ व्या वर्षी मनूने २०१८ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतासाठी दोन सुवर्णपदके जिंकली. तिच्या पिस्तूलमध्ये बिघाड झाल्यामुळे ती टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये पदक जिंकू शकली नाही.मनूने ५० हून अधिक आंतरराष्ट्रीय आणि ७० राष्ट्रीय पदके जिंकली आहेत. २०२१ च्या ऑलिम्पिकमध्ये ती सातव्या स्थानावर राहिली. २०२३ मध्ये मनूने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अनेक वैयक्तिक स्पर्धांमध्ये भाग घेणारी २२ सदस्यीय भारतीय नेमबाजी संघातील ती एकमेव खेळाडू आहे. हरियाणातील झज्जर येथे जन्मलेल्या मनू भाकरने शालेय जीवनात टेनिस, स्केटिंग आणि बॉक्सिंगसह अनेक खेळांमध्ये भाग घेतला.

### ब्रायन लाराला मागे टाकले

बॉक्सिंग खेळताना मनूच्या डोळ्याला दुखापत झाली. यानंतर तिचा बॉक्सिंगमधील प्रवास संपला. त्याचबरोबर, मनूला इतरही वेगळ्या खेळांची आवड होती, ज्यामुळे ती एक उत्कृष्ट नेमबाज बनण्यात यशस्वी झाली. आता तिने देशासाठी पदक जिंकलं आहे.भारताची २२ वर्षीय नेमबाज मनू भाकेरने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये इतिहास रचला आहे. तिने या स्पर्धेत कांस्यपदकावर आपले नाव कोरले आहे. मनू भाकेरने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलच्या अंतिम फेरीत चमकदार कामगिरी करत कांस्यपदक जिंकले. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी मनू ही पहिली महिला नेमबाज ठरली आहे. नेमबाजीत भारताच्या मनू भाकेरने कांस्य पदक जिंकत यंदाच्या ऑलिम्पिक २०२४ मधील पहिले पदक पटकावून दिले आहे. पॉईंट १ गुणाने मागे राहिल्याने मनू भाकेरला तिसऱ्या स्थानी समाधान मानावे लागले.

# ऑलिम्पिक समालोचकाच्या वक्तव्याने पाकिस्तानी संतापले

## 24 कोटी लोकांचा देश, पण ऑलिम्पिकमध्ये फक्त 7 खेळाडू

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये ऑलिम्पिक २०२४ स्पर्धा सुरु झाली आहे. पॅरिसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या ऑलिम्पिकचा स्पर्धेचं उद्घाटन २६ जुलै रोजी झालं. या कार्यक्रमात सहभागी देशांनी परेड केली. यामध्ये पाकिस्तानची तुकडीही सहभागी होती. मात्र, याचवेळी एका समालोचकाने लाईव्ह शोमध्ये पाकिस्तानी खेळाडूंच्या तुकडीच्या आकारावर केलेल्या एका टिप्पणीमुळे वाद निर्माण झाला आहे.**




पॅरिसमध्ये ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात पाकिस्तानची परेड सीन नदीवरून जात असताना लाईव्ह शो मध्ये एका समालोचकाने म्हटलं की, "आम्ही तुम्हाला सांगतो की पाकिस्तानचा संघ १८ सदस्यांसह ऑलिम्पिकमध्ये पोहोचला आहे. या १८ सदस्यांच्या संघात फक्त ७ खेळाडू आहेत तर ११ अधिकारी आहेत. पाकिस्तान हा २४ कोटी लोकांचा देश आहे. पण ऑलिम्पिकमध्ये फक्त ७ खेळाडू सहभागी होण्यासाठी आले आहेत."पाकिस्तानबाबत केलेल्या या विधानाचा या कॉमेंटेटरचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. दरम्यान, पाकिस्तानने शेवटचं ऑलिम्पिक पदक १९९२ मध्ये जिंकलं होतं. आतापर्यंत पाकिस्तानचा ऑलिम्पिकमधील विक्रम जास्त काही खास नाहीत. पाकिस्तानला पहिलं पदक १९५६ मध्ये मिळालं होतं. तसेच १९९२ मध्ये ऑलिम्पिकमध्ये शेवटचं पदक जिंकलं होतं. १९९२ मध्ये ऑलिम्पिकमध्ये पाकिस्तानच्या हॉकी संघानं तिसरे स्थान पटकावत कांस्यपदक जिंकलं होतं.आता पॅरिसमध्ये सुरु असलेल्या ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेत पाकिस्तानचा पदकांचा दुष्काळ संपवतं की नाही?

### हॉकी संघाने 8 पदके जिंकली

हॉकी संघाने ८ पदके जिंकली आहेत. पाकिस्तानच्या या १० पदकांमध्ये ३ सुवर्ण, ३ रौप्य आणि ४ कांस्य पदकांचा समावेश आहे. दरम्यान, अनेक पाकिस्ताच्या नागरिकांनी ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत संबधित कॉमेंटेटरबाबत नाराजी व्यक्ती केली तर काहींनी संताप व्यक्त केला आहे. फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये ऑलिम्पिक २०२४ स्पर्धा सुरु झाली आहे. पॅरिसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या ऑलिम्पिकचा स्पर्धेचं उद्घाटन २६ जुलै रोजी झालं. या कार्यक्रमात सहभागी देशांनी परेड केली. यामध्ये पाकिस्तानची तुकडीही सहभागी होती. मात्र, याचवेळी एका समालोचकाने लाईव्ह शोमध्ये पाकिस्तानी खेळाडूंच्या तुकडीच्या आकारावर केलेल्या एका टिप्पणीमुळे वाद निर्माण झाला आहे. पॅरिसमध्ये ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात पाकिस्तानची परेड सीन नदीवरून जात असताना लाईव्ह शो मध्ये एका समालोचकाने म्हटलं की,.